खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरूनगर

ता. खेड, जि.पुणे

**ग्रीन क्लब**

## पाणी अंकेक्षण

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या ग्रीन क्लबतर्फे दरवर्षी अनेक उपक्रमाचे आयोजन केले जाते. दि. १०/०९/२०२४ रोजी महाविद्यालयातील भूगोल विभाग आणि ग्रीन क्लब तर्फे पाणी अंकेक्षण कार्यशाळा म्हणजे वॉटर ऑडिट वर्कशॉप या उपक्रमाचे आयोजन केले होते. पाणी अंकेक्षण कार्यशाळेमध्ये ग्रीन क्लबचे विद्यार्थी आणि एस.वाय. बी.ए. च्या विद्यार्थी उपक्रमांमध्ये सहभागी झाले होते.

पाणी अंकेक्षण कार्यशाळेमध्ये डॉ.डी.ए.मारकड यांनी प्रारंभी पाण्याचे महत्व समजावून सांगितले. त्यानंतर पाण्याचे अंकेक्षण करण्यासाठी ज्या बाबी आवश्यक आहेत त्या बाबींची चर्चा केली. पाणी अंकेक्षणासाठी पाण्याचा स्रोत, पाण्याची पाईपलाईन, पाण्याची साठवण, पाणी साठविण्याच्या टाक्या, टाकीतून पाण्याचे वितरण, पाण्याचा वेगवेगळ्या कारणांसाठी वापर, वापर होणाऱ्या पाण्याचे प्रमाण, पाण्याची शुद्धता या सर्व बाबींचा पाणी अंकेक्षणामध्ये समावेश होतो. प्रत्येक घर, कारखाना, शाळा महाविद्यालये, सहकारी गृहसंस्था यांच्यामध्ये पाणी अंकेक्षण करता येते. पाणी अंकेक्षणामुळे पाण्याचा नेमका किती वापर होतो हे कळून येते. तसेच पाणी अंकेक्षणाचे महत्व डॉ. डी.एम. मारकड यांनी सविस्तर सांगितले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी अनुमती दिली. विभाग्रपमुख डॉ.दिलीप मुळूक यांनी कार्यशाळेसाठी मार्गदर्शन केले. ग्रीन क्लबचे समन्वयक डॉ. डी.एम.मारकड यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले तसेच रिसोर्स पर्सन म्हणून काम केले. प्रा. एम.एल.मुळूक यांनी आभार मानले.




पाणी अंकेक्षण कार्यशाळेत मार्गदश्रन करताना डॉ. डी.एम.मारकड.




पाणी अंकेक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. डी.एम.मारकड.



पाणी अंकेक्षण कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी




पाणी अंकेक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. डी.एम.मारकड.



पाणी अंकेक्षण कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी.

विभाग प्रमुख
भूगोल विभाग
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, (खेड) जि. पुणे.

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.